# जाहीर आवाहन

(सार्वजनिक आरोग्य विभागाच्या गट क व गट ड संवर्गातील परिक्षेतसाठी प्रवेशाबाबत सूचना)

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या गट क संवर्गातील पदभरतीसाठी दिनांक ०६/०८/२०२१ ते २२/०८/२०२१ व गट ड संवर्गातील पदभरतीसाठी ऑनलाईन अर्ज दिनांक ०७/०८/२०२१ ते २३/०८/२०२१ पर्यंत arogyabharti2021.in या संकेतस्थळावर मागविण्यात आले होते. या अनुषंगाने गट-क संवर्गातील पदासाठी लेखीपरीक्षा दिनांक २५/०९/२०२१ रोजी व गट-ड संवर्गातील पदासाठी लेखी परीक्षा दिनांक २६/०९/२०२१ रोजी घेण्यात येणार आहे.ज्या उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज भरलेले आहेत त्यांना लेखी परिक्षेसाठी प्रवेशपत्र खालील पध्दतीने उपलब्ध करुन देण्यात येत आहेत.

- **नोंदणीकृत मोबाईल क्रमांकाच्या व्हॉट्स ॲप नंबर वर,**
- **नोंदणीकृत ईमेल आयडीवर पाठविण्यात येत आहेत.**
- **ज्यांना ईमेलआयडी अथवा मोबाईल नंबरवर प्रवेशपत्र प्राप्त झाले नाहीत त्या उमेदवारांनी arogyabharti2021.in या संकेतस्थळास भेट देऊन प्रवेश पत्र प्राप्त करुन घ्यावे.**

संकेत स्थळाच्या होम पेजवर प्रवेशपत्र प्राप्त करुन घ्यावे याबाबत मार्गदर्शनपर माहिती देण्यात आलेली आहे. ज्या उमेदवारांना या तिन्ही माध्यमातून प्रवेशपत्र प्राप्त होवू न शकल्यास त्यांनी प्रवेशपत्र प्राप्त होणेबाबत मार्गदर्शन मिळणेसाठी helpdesk.arogyadmitcard@gmail.com या ईमेल आयडीवर होम पेजवर सॅम्पल फॉरमॅट मध्येच माहिती पाठवावी. तसेच प्रत्येक जिल्हयामध्ये प्रवेशपत्र डाऊनलोड करुन देण्यासाठी मदत करणेकरिता जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालयामध्ये मदत कक्ष निर्माण करण्यात येत आहे. ज्यांना प्रवेशपत्र प्राप्त करण्यामध्ये अडचण येत असेल त्यांनी विभागीय स्तरावर उपसंचालक आरोग्य सेवा प्रभारी मंडळ कार्यालय अथवा जिल्हा स्तरावर जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालयामध्ये मदत कक्षामध्ये जावे.

पाटील

(डॉ अर्चना पाटील)
संचालक आरोग्य सेवा, पुणे.